**विशेष दिवाणी दावा क्रमांक – ०५/२०१३**

**नि.क्र. १०३/क सोबत**

**निशाणी क्र.१७६ वरिल आदेशान्वये फेरतपास शपथेवर सुरु -**

वादी ही भागीदारी फर्म आहे. मी आजरोजी मुळ भागीदारी पत्र हजर केले आहे. मी व प्रशांत बबनराव सातपुते हे भागीदार आहोत. प्रशांत हा माझ्या साडुचा मुलगा आहे. आता मला सदरचे भागीदारपत्र दाखविले. त्यावर माझी व प्रशांतची सही आहे तसेच त्यावर साक्षीदाराच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदरचे भागीदार पत्र नोटरी वकिल श्री. सावेकर यांचे समोर करणेत आले आहे. त्यास **निशाणी क्र.१८०** देणेत येते.

२. सदरचे भागीदारी पत्र हे नोंदणीसाठी रजिस्ट्रार पुणे यांच्याकडे पाठविणेत आले. आता मला भागीदार पत्र पाठविलेली पोष्टाची पावती व पोहोच पावती दाखविणेत आली. सदरच्या पावत्या निशाणी क्र. १७४/४, १७४/५ लगत दाखल आहेत. त्या पावत्या त्याच आहेत. त्यास **निशाणी क्र. १८१ व १८२** देणेत येते. आता मला भागीदारी पत्राचा नोंदणी अर्जाचा फॉर्म दाखविणेत आला. त्याची मुळ प्रत रजिस्ट्रार, पुणे यांच्याकडे पाठविलेली आहे. त्याची स्थळ प्रत (झेरॉक्स प्रत) या कामी दाखल केलेली आहे. ती तीच आहे. त्यास **निशाणी क्र. १८३** देणेत येते. मी भागीदारी फर्मचा नोंदणी दाखला व प्रमाणपत्र दाखल केलेला आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. १८४ व १८५** देणेत येते.

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. एस.व्ही. दरिबे यांचे तर्फे सुरु :-**

३. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. १८१ कडील भागादारी पत्र हे सन २०११ पासुन २०२५ पर्यंत माझ्या ताब्यात होते. दाव्यासोबत मी वकिलांचे सल्ल्याप्रमाणे झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. मुळ कागदपत्रे दाखल करणेबाबत मला कल्पना नसलेमुळे मी दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, भागीदारी

फर्म मध्ये हिशोब स्वतंत्रपणे लिहिला जातो. हे म्हणणे खरे नाही की, आमचे भागीदारी फर्म मधुन प्रतिवादी नं.१ यांस काहीही रक्कम दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी नं.१ यांस चेक ने अगर रोख रक्कम दिलेली आहे याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे कागद तयार करुन भागीदारी फर्म नोंदणीकृत असल्याचे दाखविले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी रजिस्ट्रार पुणे यांच्याकडे लेखी पत्र व्यवहार भागीदारी फर्मच्या नोंदणी नंतर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी रजिस्ट्रार, पुणे यांच्याकडे कोणतीही लेखी तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, भागीदारी फर्म नोंदणीकृत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मिळकत खरेदी करणेपूर्वी मी व प्रशांत यांनी कोणताही लेखी ठराव केला नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, भागीदारी फर्म नमुद केलेल्या व्यवसाया व्यतिरिक्त इतर कोणताही व्यवसाय करता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मिळकत खरेदी विक्री करणे हा भागीदारी फर्मचा व्यवसाय नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, मिळकत ही भागीदारी फर्म साठी खरेदी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, भागीदारी फर्म साठी मिळकत खरेदी घेतली जाते त्यावेळी भागीदारी फर्मच्या नावाने सर्व व्यवहार केले जातात. हे म्हणणे खरे नाही की, मी भागीदारी फर्मच्या वतीने खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2025.10.18 11:25:41 +0530

दिनांक – १७.१०.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.